# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मौजे धाटीवळे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील धाटीवळे फाटा ते धाटीवळे या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१) २२२६ (२३-१२-२०१४). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धाटीवळे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील धाटीवळे फाटा ते धाटीवळे हा रस्ता खचल्याने तेथील एस.टी.बस सेवा तसेच खाजगी वाहतूकीस अनियमित सुरु असल्यामुळे वृध्द, ग्रामस्थ, शासकीय विद्यार्थ्यांना तसेच दैनंदिन व्यवहार करण्यात गैरसोय होत असल्याने सदरहू रस्त्याचे डांबरीकरण व खडीकरण करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार सदरहू रस्त्यांच्या डांबरीकरण व खडीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०२-२०१७) :**(१) निवेदन प्राप्त आहे.

(२) व (३) धाटीवळे फाटा ते धाटीवळे हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास आराखड्यामये करंजारी घाटीवळे कुरचूंब असा असून सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणाऱ्या निधी व निकषाच्या अधिनतेने व प्राधान्य क्रमाने हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**सिंधुदूर्ग जिल्हयात पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्याबाबत**

**(२) ३४६११ (२१-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग पर्यटन जिल्हा घोषित केल्यामुळे देश-विदेशातील पर्यटक येत असून पर्यटकांची सुरक्षिततेची काळजी शासनाकडून घेतली जात नसल्यामुळे गत बारा वर्षामध्ये स्थानिक पर्यटकबरोबरच राज्यातील नांदेड, पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, अशा मोठ्या जिल्ह्यांसह बेळगाव दिल्ली व अहमदाबाद येथील पर्यटकांचा तारकर्ली आणि देवबाग समुद्रकिनारी बुडून मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २४ सप्टेंबर, २००३ रोजी शासकीय तंत्रनिकेतनमधील चार विद्यार्थी व सप्टेंबर, २०१२ मध्ये कोल्हापूरचे पर्यटक त्यानंतर दिनांक ४ ऑक्टोबर, २०१२ मध्ये पुण्यातील इन्फोसीस कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करणारे अहमदाबाद आणि दिल्लीतील दोघे तरुण तारकर्लीत बुडाले तसेच अनेक जण बुडाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तारकर्ली आणि देवबाग समुद्रकिनारी पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीच उपाययोजना केली नसल्याने मृत्यूच्या घटनामध्ये वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०३-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवर (बिचेस) पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्यासाठी शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.टीडीसी-२००६/प्र.क्र.६/पर्यटन, दि. ८/९/२००६ अन्वये राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवर फिरावयास जाणाऱ्या पर्यटकांना तसेच सर्वसामान्य जनतेला पोहण्याच्या ठिकाणांवर सुरक्षिततेच्या दृष्टीने जीवनरक्षक ट्युब, जॅकेटस, सर्च लाईट, संपर्क करण्याची साधने उपलब्ध करुन देणे, धोक्याची सूचना देणारे फलक लावणे, जागेची माहिती देणारे फलक लावणे इत्यादीकरिता नियमावली तयार केली आहे.

त्याचप्रमाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने आपत्ती निवारणार्थ तहसिलदार, मालवण यांना हेवी ट्युब, सर्च लाईट, फायबर बोटी, लाईफ जॅकेटस्, लाईफ बोये, अॅल्युमिनियम स्ट्रेचर, मोठ्या चार्जेबल टॉर्चेस, नायलॉन रेस्क्यु रोप, इमर्जन्सी लाईट सिस्टीम इत्यादी साहित्याचे वाटप केले आहे.

तसेच देवबाग तारकर्लीसाठी मेगाफोन, लाईफ जॅकेटस्, स्ट्रेचर वॉच टॉवर, सर्च लाईट, सायरन, वॉकी-टॉकी, रंगीत झेंडे इ. साहित्य शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.टीडीसी-२०१६/७/प्र.क्र.५२२/पर्यटन, दि. २०/७/२०१६ अन्वये मंजूर करण्यात आले आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २५ व्यक्तींना जीवनरक्षकाचे प्रशिक्षण (Beach Safety Lifeguard Training) देण्यात आले आहे.

---

**कसबा (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाची देखभाली अभावी झालेली दुरवस्था**

**(३) ३६५७७ (२०-०१-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसबा (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाची देखभाली अभावी दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाकडे जाणारा रस्ता सुस्थितीत नसून स्मारक परीसरातही अस्वच्छता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ऐतिहासिक स्मारकाची निगा राखणे, आवश्यक कामे करणे व पर्यटनदृष्ट्या विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०३-२०१७) :**(१) व (२) होय.

(३) "कोकण विकास पॅकेजअंतर्गत पर्यटन स्थळांचा विकास करणे" या कार्यक्रमांतर्गत छत्रपती संभाजी स्मारक वास्तूची सुधारणा करण्याच्या कामासाठी निधी विरतीत करण्यात आला होता. या ठिकाणी प्रसाधनगृह व इतर कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आली आहेत. सन २०१२ मध्ये अपर जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेल्या बैठकी अन्वये सदर स्मारक वास्तू पूर्ण करुन सुस्थितीमध्ये छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती यांच्याकडे हस्तांतरीत करुन त्यांच्या ताब्यात देण्यात आली होती. हे स्मारक श्री. छत्रपती संभाजी महाराज स्मारक मंडळ, रत्नागिरी या नोंदणीकृत प्रतिष्ठानच्या ताब्यात आहे. या स्मारकाच्या देखभालीबाबत मंडळाकडून आवश्यक कार्यवाही करुन घेण्याबाबत ग्राम विकास व जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुळा धरणामध्ये विस्तापित झालेल्या ७० प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत**

**(४) ३६७७८ (१५-०१-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळा धरणामध्ये विस्तापित झालेल्या ७० प्रकल्पग्रस्तांनी माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण करुन प्रकल्पग्रस्तांसमवेत स्थानिक लोकप्रतिनिधी (नेवासा) यांनी मा.जलसंपदा मंत्री यांची भेट घेऊन चर्चा केली असता मा.मंत्री महोदयांनी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत मार्ग काढण्यात येईल असे आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३) तसेच प्रकल्पग्रस्तांचा दाखला तीन पिढीपर्यंत लागू राहिल असा शासनाने निर्णय घेतला असून जोपर्यंत लाभ मिळत नाही तोपर्यंत दाखल्याची मर्यादा वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७)** :(१) व (२) होय, मुळा धरण प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नासंदर्भात पालक मंत्री अहमदनगर यांच्या समवेत मा.मंत्री (जलसंपदा) यांची चर्चा झाली आहे. त्यांच्या मागण्यासंदर्भात जलसंपदा विभागासंबधीत प्रश्नाबाबत या विभागाकडून कार्यवाही करण्याबाबत चर्चा झाली.
(३) व (४) प्रकल्पग्रस्तांना जोपर्यंत लाभ मिळत नाही, तोपर्यंत दाखल्याची मर्यादा वाढविण्याबाबत प्रस्ताव सद्य:स्थितीत विचाराधीन नाही.

---

**जळगांव जिल्हयातील मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पात निर्माण झालेल्या पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत**

**(५) ४०११६ (०५-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पातील पाणी पातळी झपाटयाने कमी होत असल्याने पाचोरा, भडगांव, एरंडोल व धरणगांव तालुक्यांना माहे जानेवारी, २०१६ पासून पाणी टंचाईला समोरे जावे लागणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धरणातील अल्प साठयामुळे निर्माण झालेली पाणी टंचाई दूर करण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०३-२०१७)** :(१) होय, अंशत: खरे आहे.
(२) जळगांव जिल्ह्यातील पाचोरा, भडगाव, एरंडोल व धरणगांव या तालुक्यांना अनुक्रमे गिरणा, अंजनी व हतनुर जलाशयातुन पिण्यासाठी पाण्याचे आरक्षण जिल्हाधिकारी, जळगांव यांनी केले होते.

सन २०१५-१६ या वर्षासाठी जिल्हाधिकारी, जळगाव यांनी केलेल्या २९३.०५५ दलघमी पाणी आरक्षणाच्या मागणीनुसार वेळोवेळी बिगर सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले आहे.

पाणी टंचाई दूर करण्यासाठी जिल्हापरिषद जळगांव यांचे मार्फत पाचोरा तालुक्यात ५२ गावात ६९ उपाय योजना, भडगांव तालुक्यात ४२ गावात ७९ उपाययोजना, एरंडोल तालुक्यात ७० गावात १३० उपाययोजना व धरणगांव तालुक्यात ११० गावात १७१ उपाययोजना घेण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नागपूर येथील दिक्षाभूमीला जागतिक पर्यटन स्थळाचा दर्जा मिळण्याबाबत

**(६) ४१८४९ (२०-०५-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील दिक्षाभूमीच्या विकासासाठी राज्य शासनाने नऊ कोटी रुपये मंजूर केलेले असून मा.मुख्यमंत्री यांनी दिक्षाभूमीला जागतिक पर्यटन स्थळाचा दर्जा मिळण्यासाठी विकास आराखडा तयार करण्याचे आदेश माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात सुधार प्रन्यासला दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०३-२०१७) :**(१) दिक्षाभूमी या “अ” वर्ग पर्यटन स्थळाच्या विकास आरखड्याची जबाबदारी नागपूर सुधार प्रन्यास यांच्याकडे सोपवली होती. त्यानुसार दिक्षाभूमी येथील रु. ९.९० कोटीच्या विकास कामांचा प्रस्ताव केंद्रीय पर्यटन मंत्रालयास सादर करण्यात आला आहे.

(२), (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील समुद्र किनारी पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्याबाबत

**(७) ४९९६६ (२०-०५-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समुद्र किनारी लाईफ गार्ड, वॉच टॉवर, वार्निग सिग्नल अशा सुरक्षा व बचाव उपाययोजनांच्या अभावी पर्यटकांचे अपघातातील मृत्यूचे प्रमाण वाढत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बचाव सुविधांची व्यवस्था करण्याबाबत सन २००६ मध्ये हायकोर्टाच्या आदेशानुसार शासनाने निर्णय जाहीर करूनही त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०३-२०१७) :**(१) मुंबई, पालघर व सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटकांचे बुडून मृत्यूमुखी पडण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत नाही. मात्र, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यात एकाच घटनेत अनुक्रमे ९ व १३ जण बुडाल्याने ते वाढल्याचे दिसते.

(२) व (३) राज्यातील समुद्र किनाऱ्यांवर (बिचेस) पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्याबाबत शासन निर्णय दिनांक ८/९/२००६ अन्वये उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी नागरी क्षेत्रात नगर विकास विभाग व ग्रामीण भागात ग्राम विकास विभागाची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या शासन निर्णयाची बहुतांश अंमलबजावणी झालेली आहे. प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेण (जि.रायगड) तालुक्यातील बाळगंगा धरणाच्या विस्थापितांच्या पुर्नवसनाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(८) ५३७०९ (२४-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील बाळगंगा धरणाच्या विस्थापितांच्या पुर्नवसनाचे काम न झाल्यामुळे धरण बांधण्याचे काम थांबले असल्याचे माहे जून २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सिडकोकडून भूसंपादनासाठी जलसंपदा विभागाकडे निधी वर्ग केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धरणाचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने नवीन कायदयातील तरतुदीनुसार बाजार भावाने धरणग्रस्तांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
केवळ पुनर्वसनाअभावी बाळगंगा धरणाचे काम थांबलेले नसून, भूसंपादने, वन जमीन हस्तांतरण तसेच कंत्राटी विवादामुळे धरणाचे काम मार्च, २०१२ पासून बंद आहे.
(२) बुडीत क्षेत्रासह धरण परिसर आणि पुनर्वसन गावठाणाकरिता करावयाच्या भूसंपादनासाठी सिडकोकडून रु. ५९९.९२ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून तो महसूल विभागाकडे वर्ग केलेला आहे.
(३) बाळगंगा प्रकल्प भूसंपदान प्रस्तावातील संपादित जमिनीचे मुल्यांकन हे नवीन भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम २४ मधील तरतुदीप्रमाणे तसेच कलम २६ ते ३० अन्वये निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये जमिनीची कलम ४ ची अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या मागील ३ वर्षाचे खरेदी-विक्री व्यवहार व कलम ४ ची अधिसूचना प्रसिध्द झालेल्या वर्षाचे बाजार मुल्यदर यांची तुलना करता उच्चतम दर असणारे मूल्यांकन निश्चित करण्यात आले आहे.

तसेच शासनाच्या दि. २६/०५/२०१५ च्या अधिसूचनेप्रमाणे संपादित क्षेत्रातील गावे रायगड प्रादेशिक योजनेत अंतभूत असल्याने गुणांक १.५० प्रमाणे जमिनीचे मुल्यांकन निश्चित करण्यात आले आहे. सदर जमिनीचे मुल्यांकन अधिक जमिनीशी निगडीत असणारे झाडे व बांधकाम यांचे मुल्यांकन मिळवून आलेल्या रकमेएवढीच रक्कम म्हणजे १००% दिलासा दिला आहे. तसेच जमिनीच्या मुल्यांकनावर १२% व्याज कलम ४ ची अधिसूचना प्रसिध्द केल्यापासून निवाडा जाहीर होण्याच्या मुदतीपर्यत अतिरिक्त रक्कम म्हणून देण्यात आली आहे. याप्रमाणे संपादित जमिनीची नुकसान भरपाई प्रकल्पग्रस्तांना देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील शेतकऱ्यांना विविध प्रकल्पांसाठी संपादीत केलेल्या त्यांच्या शेतजमिनींच्या नुकसान भरपाईच्या थकीत रकमा मिळण्याबाबत**

**(९) ५४५६५ (२४-०८-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्यासाठी संपादीत झालेल्या मौजे मुखेड (ता.येवला, जि.नाशिक) व येथील शेतकऱ्यांना शेतजमिनींच्या नुकसान भरपाईच्या थकीत रकमा मिळण्यासाठी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान व मौजे कुसूर (ता.येवला, जि.नाशिक) येथे ओझरखेड उच्चस्तर पोहोच कालव्यासाठी संपादीत जमिनींची न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार वाढीव नुकसान भरपाई मिळण्यासाठी माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनीधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच वडेल (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांनी पाझर तलावासाठी सरकारला जमीन देवूनही सुमारे पावणे दहा कोटींचा न्याय मोबदला त्यांना न दिल्यामुळे न्यायालयाने दिनांक १२ एप्रिल २०१६ रोजी वा त्यासुमारास नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांची खुर्ची आणि सरकारी वाहन जप्त केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७) :**(१) होय.
(२) होय.
(३) नांदुर मधमेश्वर जलद कालव्यासाठी संपादीत जमिनीचा वाढीव मावेजा मिळणे संदर्भात मौ.मुखेड (ता.येवला, जि.नाशिक) येथील ४३ प्रकरणे असून सदर प्रकरणात मा.निफाड न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने कायदा सल्लागार यांच्या सल्ल्यानुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल दाखल करण्यात आले आहेत. सदर अपिल दाखल प्रकरणांपैकी १२ प्रकरणात संपूर्ण रक्कम सहा आठवड्यात भरण्याचे मा.उच्च न्यायालयाचे दिनांक २१.०१.२०१५ रोजी आदेश झाले आहे. उर्वरित ३१ प्रकरणात मा.उच्च न्यालयाचे स्थगन आदेश प्राप्त नाहीत. करीता जिल्हा न्यायालयाने जप्ती आदेश निर्गमित केले आहे. या प्रकरणात

मा.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, निफाड यांच्या निर्णयानुसार ४३ शेतकऱ्यांना रुपये ७२४.२४ लक्ष देणे आहे. यापैकी रुपये ३०.०० लक्ष मा.न्यायालयात जमा केलेले आहेत.

नांदुर मधमेश्वर जलद कालवा प्रकल्प भूसंपादन प्रकरणी मौ.मुखेड, ता.येवला, जि.नाशिक येथील ४३ शेतकऱ्यांना भूसंपादन मावेजा अदा करण्यासाठी रुपये ६९७.२४ ची आवश्यकता आहे. निधीच्या उपब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

उर्ध्व गोदावरी प्रकल्पात समाविष्ट असलेल्या मौ.कुसुर, ता.येवला, जि.नाशिक येथील दरसवाडी पोहोच कालवा कि.मी. ५२ ते ५४ साठी भूसंपादन केस क्र. १८/९४ अन्वये संपादित केलेल्या जमिनीवरील भूसंपादन कायदा कलम १८ खाली दाखल भूसंदर्भ क्र. ५०/२००४ प्रकरणी मा.न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार वाढीव नुकसान भरपाई रक्कम रुपये ४२.१४ लक्ष इतकी आहे.

मा.न्यायालयाच्या आदेशानुसार वडेल, ता.मालेगांव, जि.नाशिक येथील शेतकऱ्यांना पाझर तलावासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा भूसंपादन कायदा कलम १८ खालील वाढवून दिलेला रुपये १०,५५,१३,७२७/- इतका निधी नियोजन विभाग (रोहयो), यांनी दि. १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये जिल्हाधिकारी, नाशिक यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उजनी धरण (जि.सोलापूर) ते सिना कोळेगांव जेऊर बोगदयाचे**
**काम निधीअभावी बंद असल्याबाबत**

**(१०) ५५५२६ (२४-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरण (जि.सोलापूर) ते सिना कोळेगांव जेऊर बोगदयाच्या योजनेसाठीच्या योजना परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील सिना कोळेगाव धरणामध्ये आणण्यासाठी चार वर्षापूर्वी मंजूर झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेला निधी मिळण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना दोन वर्षापासून तसेच दिनांक ६ जून २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेला दोन वर्षापासून निधी उपलब्ध न झाल्याने योजना बंद झाली असल्यामुळे उजनी धरणातील पाणी कनार्टक राज्यात वाहून जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनानुसार उजनी धरण (जि.सोलापूर) ते सिना कोळेगांव जेऊर बोगदयाच्या योजनेसाठी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०३-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजनेस शासनाने दिनांक ७ जुलै, २००९ रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. या योजने अंतर्गत उपसा सिंचन योजना क्र.१ मध्ये जेऊर बोगद्याव्दारे परांड्यासह भूम, वाशी, कळंब, उस्मानाबाद या तालुक्यास सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे.

(२) होय.

(३) प्रकल्प अहवालानुसार सदर प्रकल्पाचा पाणी स्त्रोत हा कृष्णा भिमा स्थिरीकरण लिंक क्र.५ मधून उजनी जलाशयात उपलब्ध होणाऱ्या पाण्यातून असल्याने उजनी जलाशयातून जास्त पावसाच्या वर्षात वाहून जाणाऱ्या पुराच्या पाण्याशी या प्रकल्पाच्या पाणी वापराची सांगड घालता येत नाही. पुरेशा निधी अभावी दिनांक ८/११/२०१२ पासून जेऊर टनेलचे काम तात्पुरत्या स्वरुपात बंद आहे.

(४) योजनेच्या पहिल्या टप्प्याचे काम पुढील ४ वर्षात पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे. यासाठी पुरेसा नधी उपलब्ध व्हावा या उद्देशाने या योजनेस लागणारा निधी मा. राज्यपाल महोदयांचे निधी वाटपांचे सुत्राबाहेर ठेवण्याची विनंती मा.राज्यपाल महोदयांना करण्याचा निर्णय मा.मंत्रीमंडळाने घेतला होता व त्याप्रमाणे मा.राज्यपाल यांना दिनांक २५/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पश्चिम महाराष्ट्र कुंभी-कासारी-कडची-वाटणा-कृष्णा-नीरा ते भीमा नदी जोड प्रकल्पाबाबत**

**(११) ५५६२८ (०१-०९-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्र कुंभी-कासारी-कडची-वाटणा-कृष्णा-नीरा ते भीमा असा सुमारे दोनशी किलोमीटरचा नदी जोड प्रकल्पांचा शासनाचा प्रस्ताव असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरचा प्रकल्प लवकर पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७) :**(१) कृष्णा भिमा स्थिरीकरण प्रकल्पास दि. ४ फेब्रुवारी, २००४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) या योजनेद्वारे कृष्णा खोऱ्यातील उर्ध्व कृष्णा (के१) उपखोऱ्यातील अतिरिक्त पाणी उर्ध्व कृष्णा (के१) व उर्ध्व भीमा (के५) उपखोऱ्यातील दुष्काळी भागातील सिंचन योजनेसाठी प्रवाही पध्दतीने बोगद्याद्वारे वळविण्याची ही योजना आहे.

(३) सदर प्रकल्पास महाराष्ट्र शासन निर्णय दि. ४/०२/२०१०४ अन्वये रु. ४९३२ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

तथापि, कृष्णा पाणी तंटा लवाद - २ अंतिम निर्णय दि. २९/११/२०१३ रोजी जाहिर झाला असून, सदर निर्णयामध्ये कृष्णा खोऱ्यातील पाणी एका उपखोऱ्यातून दुसऱ्या उपखोऱ्यात वळविण्यास बंधन घातलेले आहे.

दुसऱ्या लवादाचे निर्णयाचे अनुषंगाने सदर प्रकल्पाची फेर आखणी करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डिंभे (जि.पुणे) येथील धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्यातून गळतीमुळे लाखो लिटर पाणी वाया जात असल्याबाबत**

**(१२) ५६३२० (२९-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील डिंभे धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असून त्यामुळे लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्र्यांकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डाव्या कालव्याची कॉक्रीटचे अस्तरीकरण खचलेले असल्याने हा कालवा पाणी वाहण्यासाठी धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या डिंबे धरणाच्या उजव्या कालव्याचे शिरुर तालुक्यातील चाऱ्या, पोटचाऱ्या व कालव्याचे अल्पशे काम अपूर्ण राहिल्याने २ ते ३ हजार हेक्टर जमीन पाण्यापासून वंचित राहिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डिंबे धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्याचे अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबत व गळती थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१७) :**(१) होय.

(२) नाही.

(३) उजव्या कालव्याचे शिरुर तालुक्या मधील चाऱ्या पोटचाऱ्यांची कामे प्रगतीपथावर असून निधीच्या उपलब्धतेनुसार कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात कुकडी प्रकल्पासाठी रु.२५.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे. कुकडी प्रकल्पाच्या रु. ३१५१.६१ कोटी किंमतीच्या तृतीय सु.प्र.मा.प्रस्तावास मंजूरी

देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून त्यास मान्यता प्रदान केल्यानंतर अपुर्ण कामे व अस्तरीकरणाची कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हवेली (जि.पुणे) तालुक्यातील कोरेगांव मुळ ते बीवरी या दरम्यान मुळा-मुठा नदीवरील बंधाऱ्याला संरक्षक कठडे बसविण्याबाबत**

**(१३) ५६३८४ (११-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील कोरेगांव मुळ ते बीवरी या दरम्यान मुळा-मुठा नदीवरील बंधाऱ्याला संरक्षक कठडे बसविण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बंधाऱ्याची दुरवस्था झाल्याने येथे अनेक वेळा अपघात झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीवरी गावाच्या ग्रामस्थांनी स्वखर्चाने पुलाच्या एका बाजुला भराव टाकला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या बंधाऱ्यावर संरक्षक कठडे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१७) :**(१) व (२) नाही.
सदर बंधाऱ्याचे मुळ काम करताना बंधाऱ्याला संरक्षक कठडे (Pipe Railing) बांधण्यात आले होते. तथापि, सध्या ते नादुरुस्त झाले आहेत मात्र या बंधाऱ्याची दुरवस्था झाल्याने तेथे अनेकवेळा अपघात झाले असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) पुरामुळे शेत जमिनीची धूप होऊ नये यासाठी बंधाऱ्याच्या वरील भागात डावीकडील तीरावर शेतकऱ्यांनी त्यांच्या खाजगी क्षेत्रात सुरक्षात्मक उपाययोजनेचे काम केलेले आहे.
(४) व (५) बीवरी कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यावर संरक्षक कठडे बसविण्याचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजन आहे.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील कुकडी आवर्तनातून विनापरवाना पाणी उपसा होत असल्याबाबत**

**(१४) ५६५९१ (११-०८-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील येथील कुकडी आवर्तनातून पाणी उपश्यास बंदी असताना प्रतिष्ठीत व्यक्तींकडून पाणी उपसा होत असल्याचे माहे मे,२०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार कुकडी आवर्तनातून विनापरवाना पाणी उपसा करणाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी सुचविल्यानुसार दिनांक १९/०४/२०१६ ते ०४/०५/२०१६ या कालावधीत फक्त कुकडी डावा कालवा कि.मी. ११० ते १६५ मधून पिण्याचे पाणी सोडण्याचीकार्यवाही पोलीस बंदोबस्तात करण्यात आली. त्यावेळी कि.मी. १४१ मध्ये कालवा भरारी पथकास रात्रीचे वेळेस काही शेतकऱ्यांनी अनधिकृत पाणी उपसा करण्यासाठी पाईप टाकल्याचे निदर्शनास आले असता सदर पाईपलाईन पोलिस बंदोबस्तात कायमस्वरुपी काढून टाकण्यात आलीआहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील शाई धरणांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१५) ५६५९२ (२४-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील शाई नदीवरील शाई धरण प्रकल्प रद्द करुन लघुपाटबंधारे बांधण्याची मा. मुख्यमंत्री यांचेकडे शेतकरी संघर्ष समितीने दिनांक १६ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास वारंवार मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच ठाणे जिल्हयातील पाणीटंचाईसाठी शाई धरण प्रकल्प पुर्ण करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यावर कोणता निर्णय घेतला आहे,
(४) असल्यास, शेतकऱ्यांचे पुनर्वसन करुन शाई धरण प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.
तथापि, शेतकरी संघर्ष समितीने दिनांक २५/०७/२०१६ रोजी दिलेल्या मागणीच्या निवेदनाची प्रत कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे कडे दिनांक ३०/९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे.

(२) होय.
(३), (४) व (५) शाई प्रकल्पास प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असल्याने भूसंपदान प्रक्रिया अद्याप सुरु झालेली नाही. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने काळू धरणाचे काम पूर्ण झालेशिवाय शाई धरणाचे काम हाती घेऊ नये असे कळविलेले आहे. त्यामुळे सदर कामास अद्याप सुरुवात केलेली नाही.

काळू प्रकल्पाच्या बांधकामास मा.उच्च न्यायालयाचे अंतरिम आदेशा अन्वये स्थगिती दिली असल्याने काम दिनांक १/३/२०१२ पासून बंद आहे. मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये आवश्यक संवैधानिक मंजूऱ्या प्राप्त करुन घेणेची कार्यवाही सुरु आहे.वनजमीनीसाठी नक्त वर्तमान मुल्याची रक्कम भरणा करणेसाठी अद्याप मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रक्कम उपलब्ध करुन दिलेली नाही. त्याबाबत पाठपुरावा चालू आहे.

---

**भातसा (ता.शहापुर, जि.ठाणे) धरणाच्या अधोबाजूस असलेल्या १५० एकर जागेत वृंदावन गार्डन विकसित करण्याबाबत**

**(१६) ५६६४५ (१८-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील मुंबई-नाशिक महामार्गालगतच्या भातसा (ता.शहापुर) धरणाच्या अधोबाजूस असलेल्या १५० एकर जागेत वृंदावन गार्डन विकसित करण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतलेला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, स्थानिकांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी सदरचा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

भातसा धरणाच्या अधोबाजूस ६० हेक्टर जमीन “बांधा, वापरा व हस्तांतर करा” या तत्वावर विकसित करण्याबाबत तत्कालीन मा.मंत्री, जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५/१/२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.
(२) बैठकीतील निर्णय खालीलप्रमाणे :-

(अ) भातसा धरणाचे अधोबाजूकडील ६० हेक्टर सरकारी जमिनीवर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वाने पर्यटनस्थळ विकसीत करण्यात यावे.

(ब) यासाठी शासनाने कोणतीही आर्थिक गुंतवणूक करु नये.

(क) शासनाच्या जागा ही शासनाची गुंतवणूक समजून शासनास नफ्यातील वाटा मिळावा या संकल्पनेवर प्रकल्प विकसीत करावा.

सदरहू ६० हेक्टर जमिनीपैकी फक्त ११.१८ हेक्टर क्षेत्र या विभागाच्या ताब्यात विखुरलेल्या ठिकाणी असल्याने वृंदावन गार्डन पर्यटन स्थळ म्हणून विकसीत करणे अव्यवहार्य वाटत असल्याने सदर प्रकरण शासनस्तरावर बंद करण्यात यावे. अशी कोकण महामंडळाने सहमती व शिफारस केल्याने सदरहू प्रकरण शासनस्तरावर बंद करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गेरा ब्रु. (ता.चिखली, जि.बुलढाणा) शिवारामध्ये सुरु असलेले कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१७) ५६७७३ (२४-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेरा ब्रु. (ता.चिखली, जि.बुलढाणा) शिवारामध्ये सुरु असलेले कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येऊन मातीमिश्रीत वाळू आणि गिट्टीचा चुरा बांधकामात वापरण्यात येत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निकृष्ट बांधकामाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार कालव्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१७) :**(१) नाही. तथापि, खडकपुर्णा प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना टप्पा क्र. ६ च्या मुख्य कालाव्यावरील मेरी वितरीकेवरील सा.क्र.११,२९५ मी वरील पुलाचे बांधकामाच्या गुणवत्तेबाबत दि. २५ मे, २०१६ च्या वृत्तपत्रात उल्लेख आहे.
(२) वृत्तपत्र बातमीची दखल घेऊन संबंधीत उपविभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी दि. २५ मे, २०१६ रोजीच कामाची पाहणी केली. कामाचा दर्जा चांगला आढळला. त्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुदरगंड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पर्यटनस्थळाचा विकास करण्याबाबत**

**(१८) ५६८०९ (२३-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुका निसर्ग सौदर्याने नटलेला असून उक्त पर्यटन स्थळाचा विकास करण्यात आला नसल्याचे माहे मे, २०१६ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूदरगड तालुक्यातील पर्यटन स्थळाचा विकास करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०३-२०१७) :**(१) नाही.

(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि. ४/११/२०१० च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्यामार्फत कोल्हापूर जिल्हयाचा पर्यटन बृहत विकास आराखडा तयार करण्यात आला असून सदर आराखड्यात भुदरगड व रांगणा या स्थळांचा समावेश आहे. शासनाच्या अंतिम मान्यतेनुसार निधीच्या उपलब्धतेच्या अधीन कामांच्या प्रधान्य क्रमानुसार आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

भुदरगड तालुक्यातील पर्यटनस्थळांचा विकास करण्यासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत सन २००७-२००८ या वर्षी रु.२० लक्ष, सन २००८-२००९ या वर्षी रु.५८.२१ लक्ष आणि २०१४-२०१५ या वर्षी रु २५ लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच भुदरगड किल्ला येथे निसर्ग माहिती केंद्र उभारण्यासाठी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-२०१६ मध्ये वन पर्यटन योजनेअंतर्गत रु. १९.५९ लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

रांगणा व भुदरगड किल्ल्याच्या परिसरात पर्यटन सुविधा, वळवणे-हसण-राधानगरी येथील बॅकवॉटरमध्ये बोटींग सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून तयार करण्यात आला असून त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडून जागा उपलब्ध झाल्यानंतर पुढील कार्यवाही करुन द्यावयाची आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील मीणच्या पंचगंगा उजव्या कालव्यासाठी जमिनी घेतलेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देणेबाबत**

**(१९) ५७११३ (१८-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्यातील मीणच्या पंचगंगा उजव्या कालव्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या आहेत मात्र सदर शेतक-यांना अद्याप मोबदला देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार मीणच्या उजव्या कालव्यासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेतलेल्या आहेत त्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात पंचगंगा उजवा कालवा नाही. तथापि दूधगंगा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यावरील कुर शाखा कालव्यासाठी मीणचे गावातील २.३३ हे. क्षेत्रासाठीच्या दोन प्रकरणाबाबत नवीन भूसंपदान कायद्यानुसार कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) दूधगंगा प्रकल्पांतर्गत कुर शाखा अंतर्गत पाचवडे, बसरवाडी, मिणचे खुर्द व कुर येथील प्रकल्पग्रस्तांना नवीन भूसंपादन कायद्यानुसार देय असलेली मोबदला रक्कम रु. ३.२५ कोटी महामंडळाने दि. १७/१०/२०१६ रोजी वितरीत केली असून दूधगंगा कावले विभाग क्र.१, कोल्हापूर यांचेमार्फत सदर निधी उपविभागीय अधिकारी, गारगोटी (महसूल विभाग) यांचेकडे दि.१९.१०.२०१६ रोजी वर्ग करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली-सोलापूर जिल्ह्यातील टेंभू योजनेची सर्व कामे पुर्ण करण्याबाबत

**(२०) ५७३२७ (०१-०९-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली-सोलापूर जिल्ह्यातील टेंभू योजनेची सर्व कामे २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १६ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास टेंभू योजनेसंदर्भात झालेल्या बैठकीत दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशानुसार टेंभु योजनेची प्रलंबित कामे पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७) :**(१) टेंभू प्रकल्पाबाबत मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १६/०५/२०१६ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदय यांनी प्रकल्पासाठीच्या वार्षिक अर्थसंकल्पिय तरतूदीतून तसेच अवर्षण प्रवण क्षेत्रासाठी पाटबंधारे प्रकल्पास अर्थसहायासाठी केंद्रास सादर केलेल्या प्रस्तावातून टेंभू प्रकल्पासाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करुन देता येईल, तसेच सदर निधीतून प्राधान्याने प्रकल्पाची मुख्य कालव्याची कामे पूर्ण करणे तसेच टप्प्याटप्याने उर्वरित सर्व कामे पूर्ण करणेबाबत सूचना दिल्या आहेत.

(२) सदर योजनेकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतुद रु. ८०.०० कोटी इतकी करण्यात आली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार या योजनेची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रलंबित मांजरपाडा सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(२१) ५७७०९ (२९-०८-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रलंबित मांजरपाडा सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कर्जरोखे काढण्याचा निर्णय घेतला असून सिंचन विषयक विशेष चौकशी समितीच्या अहवालानुसार उर्ध्व गोदावरी प्रकल्पातील १७ वळण योजना व पुणेगाव दरसवाडी - डोंगरगाव पोहोच कालवा इ. बाबत राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनास अहवाल पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मांजरपाडा वळण योजनेचे बंद असलेले काम तातडीने सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतीनिधींनी दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेसाठी किती कोटीचे कर्जरोखे काढण्यात येणार आहेत व या कर्जरोख्यातून प्रलंबित सिंचन प्रकल्प पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७) :**(१) होय.
(२) होय.
(३) राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालानुसार प्रकल्पाच्या फेररचनेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे उर्ध्व गोदावरी प्रकल्पात समाविष्ट असलेल्या मांजरपाडा वळण योजनेच्या बोगद्याच्या कामाचे व्दिसदस्यीय समितीमार्फत तांत्रिक परिक्षण करुन घेण्यात आले असून त्यानुसार प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील बहिरेश्वर-कोगे बंधाऱ्यांचे दरवाज्याचे खांब क्षतिग्रस्त झाल्याबाबत**

**(२२) ५८३७६ (०१-०९-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील बहिरेश्वर-कोगे दरम्यानच्या बंधाऱ्यांचे दरवाजाचे खांब क्षतिग्रस्त झाली असल्याने हा बंधारा वाहून जाण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार बंधाऱ्याच्या दुरुस्तीकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१७) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. सदर बंधारा ६० वर्षापुर्वीचा असल्याने काही खांब क्षतिग्रस्त झालेले आहेत. परंतु बंधारा वाहून जाण्याचा धोका निर्माण झालेला नाही.

(३) व (४) केंद्र शासनाच्या १३ व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध झालेल्या निधीतून सदर बंधाऱ्याची तातडीची व अत्यावश्यक दुरुस्ती माहे जून, २०१४-१५ मध्ये पूर्ण करण्यात आलेली आहे. उर्वरित दुरुस्तीची कामे राज्य शासनाच्या विशेष दुरुस्ती, विस्तार व सुधारणा कार्यक्रमांतर्गत करण्याचे नियोजित आहे.

---

**मंचर (जि. पुणे) शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या घोडनदीवरील सुलतानपूर बंधाऱ्यातून होत असलेली पाण्याची गळती**

**(२३) ५८५९९ (२४-०८-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंचर (जि.पुणे) शहराला पिण्याच्या पाण्याचा साठा उपलब्ध करुन देणाऱ्या सुलतानपूर बंधाऱ्याच्या स्तंभातून हजारो लिटर पाण्याची गळती होत असून बंधाऱ्याला पाणी अडविण्यासाठी बसविलेले लोखंडी स्तंभे जीर्ण झाल्याने त्याच्या फटीतून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत आहे व यासंदर्भात दिनांक ०२ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा. जलसंधारण मंत्र्यांकडे निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१७) :**(१) होय.

(२) संबंधित कार्यकारी अभियंता यांनी पाहणी केलेली आहे.

(३) व (४) सदर बंधाऱ्याच्या स्तंभाच्या बांधकाम, पायाच्या बांधकामामधून व बर्ग्यामधून पाणी गळती होत असल्याचे आढळून आले आहे. गळती कमी करण्यासाठी करावयाच्या उपाय योजनेबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

---

**जनाई-शिरसाई व पुरंदर उपसा जलसिंचन योजनेमधून दौंड, बारामती व पुरंदर (जि.पुणे) तालुक्याच्या दुष्काळी भागात पाणी सोडण्याबाबत**

**(२४) ६०५२६ (२६-०८-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड, बारामती व पुरंदर (जि.पुणे) तालुक्याच्या दुष्काळी भागातील भूजल पातळी उन्हाळ्यात खाली जाते व त्यामुळे माहे फेब्रुवारी ते मे महिन्यात पाण्याची कमतरता निर्माण होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनाई-शिरसाई व पुरंदर उपसा जलसिंचन योजनेमधून माहे जुलै, ऑगष्ट व सप्टेंबर मध्ये पाणी उचलून दौंड, बारामती व पुरंदर तालुक्याच्या दुष्काळी भागातील तलाव भरण्याबाबची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. जलसंपदा मंत्री यांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनाई-शिरसाई व पुरंदर उपसा जलसिंचन योजनेमधून दौंड, बारामती व पुरंदर तालुक्याच्या दुष्काळी भागात पाणी सोडून तलाव भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील १२, बारामती तालुक्यातील १३ व पुरंदर तालुक्यातील १५ निरिक्षण विहीरी निश्चित केलेल्या असून माहे मे, २०१६ मध्ये सदर निरिक्षण विहिरी निश्चित केलेल्या असून माहे मे, २०१६ मध्ये सदर निरिक्षण विहिरींची भूजल पातळी खाली गेल्याचे दिसून आले आहे.

(२) होय.

(३) दिनांक ९/८/२०१६ पासून पुरंदर उपसा सिंचन योजनेद्वारे, पुरंदर उ.सिं.यो. च्या लाभक्षेत्रातील दौंड, बारामती व पुरंदर तालुक्याच्या दुष्काळी भागातील तलावात पाणी सोडण्यात आले आहे.

तसेच, दिनांक ६/९/२०१६ पासून जनाई व शिरपाई या दोन्ही उपसा सिंचन योजनेद्वारे, जनाई-शिरसाई उ.सिं.यो च्या लाभक्षेत्रातील दौंड, बारामती व पुरंदर तालुक्याच्या दुष्काळी भागातील तलावात पाणी सोडण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जुना मुठा उजवा कालव्यातून होणारी पाणीगळती रोखण्यासाठी कालव्याचे अस्तरीकरण करण्याबाबत**

**(२५) ६०७०७ (२६-०८-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) जुना मुठा उजव्या कालव्यातून होणारी पाणी गळती रोखण्यासाठी कालव्याचे अस्तरीकरण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०७ जुलै,२०१६ रोजी वा त्या सुमारास मा. जलसंपदा मंत्री यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,दौंड तालुक्याच्या जलसंपदा विभागाच्या विविध प्रश्नासंदर्भात मा. जलसंपदा मंत्री यांचे मंत्रालयातील दालनात माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत दिनांक १५ नोव्हेंबर, २०१५ रोजी पर्यंत विविध कामांची अंदाजपत्रके सादर करण्याचे आदेश मा. जलसंपदा मंत्री यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने तसेच मा. जलसंपदा मंत्री यांनी उक्त नमूद बैठकीत दिलेल्या आदेशानुसार अंदाजपत्रक सादर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१७) :**(१) होय. मा.विधानसभा सदस्य, दौंड यांनी त्यांच्या दि. २८/०७/२०१६ च्या निवेदनान्वये अशी मागणी केलेली आहे.

(२) दौंड तालुक्याच्या प्रश्नांसदर्भात दि. २२/०८/२०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत दौंड तालुक्यातील कामांची अंदाजपत्रके सादर करण्याबाबत संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निदेश दिले होते.

(३) दौंड तालुक्यातील विस्तार व सुधारणा अंतर्गत दुरुस्तीची १० कामे प्रस्तावित आहेत. त्यापैकी ०४ प्रस्ताव शासनास प्राप्त झाले असून उर्वरित अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

दि. १७/११/२०१६ च्या शासन निर्णयान्वये पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळाकडे वर्ग करण्यात आले आहे व पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या दुरुस्तीच्या कामासाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार हे सर्व प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना परत पाठविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील पंचगंगा नदीवरील रुई बंधा-याची झालेली दुरवस्था**

**(२६) ६०८४८ (०१-०९-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील पंचगंगा नदीवरील रुई बंधा-याची दुरावस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पाटबंधारे विभागाकडे तक्रार करुन कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार पंचगंगा नदीवरील रुई बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१७)** :(१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) रुई बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम मार्च, २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरासाठी एक ते सव्वा टीएमसी पाणी पुरेसे असतांना या शहरासाठी उजनी धरणातून २५ टीएमसी पाणी देण्यात येत असल्याबाबत**

**(२७) ६१०५२ (१०-०८-२०१६). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरासाठी एक ते सव्वा टीएमसी पाणी पुरेसे असतांना या शहरासाठी उजनी धरणातून २५ टीएमसी पाणी देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित २४ टीएमसी पाणी नेमके कुठे जाते याबाबतची चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१७)** :(१) हे अंशत: खरे आहे.

(२) सोलापूर शहरासाठी उजनी धरणातून भीमा नदीमार्गे २४० कि.मी. अंतरावरील औज व चिंचपूर बंधाऱ्यात पाणी सोडण्यात येेते. सोलापूर शहरासाठी भीमा नदीत सोडण्यात येत असलेल्या पाण्यामुळे पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा या शहर पाणी पुरवठा, भीमा नदी तिरावरील २८ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना व १२ औद्योगिक पाणी पुरवठा योजनांना उपलब्ध होते. तसेच भीमा नदी तिरावरील सुमारे ४१००० हेक्टर क्षेत्रास उपसा सिंचनाद्वारे पाणी उपलब्ध होते.

(३) भीमा नदीमार्गे होणाऱ्या पाण्याचा वहनव्यय टाळण्यासाठी उजनी जलाशयावरुन सध्या सुरु असलेल्या थेट पाईपलाईन द्वारे (Closed Pipe) योजनेला समांतर अशी दुसरी थेट पाईपलाईन योजना एनटीपीसीच्या सहकार्याने सोलापूर महानगरपालिकेतून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत उस्मानाबाद कालव्याच्या कामाबाबत**

**(२८) ६१०५४ (२३-०८-२०१६). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यात २५ टीएमसी पाणी देण्यासाठी कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत उस्मानाबाद कालव्याचे खोदकाम, मातीकाम प्राधान्य क्रमाने सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कालव्यांना येत्या १०-१५ वर्षात पाणी मिळणार नसतांनाही एवढ्या तातडीने मोठ्या प्रमाणात निधी खर्च करुन कामे करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या कामासाठी माहे जून, २०१६ अखेर किती निधी खर्च झाला आहे व अद्याप किती निधीची आवश्यकता आहे तसेच या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
दिनांक २७ ऑगस्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त कृष्णा मराठवाडा सिंचन योजनेचा पाणीवापर २६.६६ अघफू इतका आहे. ही योजना दोन टप्प्यात कार्यान्वीत करण्याचे नियोजन आहे. पहिल्या टप्प्यातील ७ अघफू पाणी वापराचे कामास प्राधान्य आहे.
उस्मानाबाद जिल्ह्यासाठीच्या उपसा सिंचन योजना क्र. १ मधील ५ कालव्याची व उपसा सिंचन योजना क्र. २ मधील ४ कालव्याची कामे सुरु आहेत.
(२) पुढील ४ वर्षात योजनेचा टप्पा १ पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) योजनेच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील कालव्याचे कामावर जून २०१६ अखेर रु.१८५.६८ कोटी खर्च झाला असून, उर्वरित कामासाठी रु. १९७.०४ कोटी ची आवश्यकता आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील कालवे व वितरण व्यवस्थेसाठी रु. ६८ कोटीची तरतूद असून या मर्यादेत कामे प्रगतीत आहेत.

---

**सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातील गाळ काढण्याबाबत**

**(२९) ६१३२८ (२९-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातील पाणी पातळी खालावली असून १२३ टीएमसी पाणी साठवण क्षमता असलेल्या या धरणात सुमारे २५ ते ३० टीएमसी इतका गाळ असल्याची शक्यता जलतज्ज्ञानी व्यक्त केली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उजनी धरणात साचलेला गाळ काढण्यास शासनाला कोट्यवधी रुपयांचा खर्च करावा लागणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत या जिल्ह्यातील ओढे, नदी, तलाव व बंधाऱ्यांतील गाळ हा लोकवर्गणीतून काढला गेला मात्र उजनी धरणातील गाळ काढण्याकडे दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उजनी धरणातील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

सन २०११ मधील सर्वेक्षणानुसार उजनी जलाशयात एकूण १४.९७ टीएमसी गाळ असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

राज्यात जलसंधारण विभागामार्फत जलयुक्त शिवार योजनेमधून ओढे, नद्या, तलाव व बंधाऱ्यातील गाळ काढण्याची कामे हाती घेण्यात येतात.मोठ्या, मध्यम प्रकल्पातील गाळ काढण्याची कामे जलसंपदा विभागामार्फत हाती घेण्यात आलेली नाहीत. तथापि प्रचलीत नियमानुसर जलाशयातून गाळ विनामुल्य काढून घेऊन जाण्यास शेतकऱ्यांना परवानगी आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जव्हार (जि.पालघर) येथील पर्यटन स्थळांचा विकास करण्याबाबत**

**(३०) ६२२४४ (२३-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार या प्रसिध्द पर्यटन स्थळातील हनुमान पॉईंट, सनसेट पॉईट, शिरपामाळ, जयसागर धरण, शिवाजी उद्यान आणि सूर्य तलाव या पर्यटन स्थळांचा विकास अद्यापी करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थळांचा विकास होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०३-२०१७)** :(१) व (२) सन २०१४-१५ या वर्षात जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सूर्य तलावयेथील जोडरस्त्याचे बांधकाम, परिसराचे सुशोभिकरण यासाठी रुपये ३० लक्ष आणि जयसागर धरण येथे संरक्षक भिंत बांधणे यासाठी रु. १० लक्षच्या कामांना प्रशसकीय मान्यता दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेबंळा प्रकल्प अंतर्गत मुख्य कालवा व वितरीकेची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) ६२८१२ (२९-०८-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाभुळगांव जि. यवतमाळ येथील बेबंळा प्रकल्पा अंतर्गत मुख्य कालवा व वितरीकेची कामे निवीदा व्दारे करण्यात येत असुन कंत्राटदार अजुनही कामे विहीत कालावधीत करीत नसल्याचे दिनांक ५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवीदा व कंत्राटदाराचे काम पुर्ण करण्याचा कालावधी संपुनही अतिरिक्त काम वाढीव मुदतीमध्ये पुर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांची संख्या किती आहे,
(३) असल्यास, वाढीव मुदतीत काम पुर्ण न करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१७)** :(१) अंशत: खरे आहे.
(२) निविदा व कंत्राटदारांचे काम पूर्ण करण्याचा कालावधी संपूनही अतिरिक्त काम वाढीव मुदतीमध्ये पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांची संख्या ११६ असून त्यापैकी फक्त ३ कंत्राटदारांना विहीत मुदतीत काम न केल्यामुळे दंडात्मक कार्यवाही बाबत पत्र दिलेले आहे.
(३) इतर कंत्राटदाराकडून काम पूर्ण करण्यास विभागास येत असलेल्या अडचणी जसे भूसंपादन, विद्युत वाहिनी विखंडन, उभारणी, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करावयाचे रस्ते व पूल इत्यादींचा विचार करता वाढीव मुदतीस सक्षमस्तरावरुन मान्यता देण्यात येत असल्याने कंत्राटदारांवर कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) येथील सोनापूर टोमटा, किरमिरी, नंदवर्धन या तीन सिचंन प्रकल्पाचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्याबाबत**

**(३२) ६३६७२ (११-०८-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) येथील सोनापूर टोमटा, किरमिरी, नंदवर्धन या तीन सिंचन प्रकल्पावर मागील दोन दशकात शासनाने कोट्यवधी रुपये खर्च केले असतांना सदर सिंचन प्रकल्पाचा लाभ गोंडपिपरी तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी होत नसल्याचे माहे मे २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजूरा क्षेत्रातून बारमाही वाहणाऱ्या वर्धा नदीवर उभारण्यात आलेला सिंचन प्रकल्पाचा उपयोग शेतकऱ्यांना शेती करण्यास होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुषंगाने गोंडपिपरी तालुक्यातील सोनापूर टोमटा, किरमिरी, नंदवर्धन हे तीन सिंचन प्रकल्प तसेच बारमाही वाहणाऱ्या वर्धा नदीवरील सिंचन प्रकल्पाचा जास्तीत जास्त लाभ शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी व्हावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०३-२०१७)** :(१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) या तीन प्रकल्पांपैकी सोनापूर टोमटा व किरमिरी दरुर उपसा सिंचन योजनांचे बांधकाम व कार्यान्वीतीकरण करण्याची कार्यवाही अद्याप सुरु आहे.

नंदवर्धन उपसा सिंचन योजना सन १९९२ पासून बंद होती. या योजनेस आवश्यक विशेष दूरुस्ती करुन पुनकार्यान्वीत करण्याचा निर्णय शासनाने सन २००३ मध्ये घेतला व त्यानुसार ही योजना पुनर्कार्यान्वीत देखील करण्यात आली. मात्र सन २०१२ च्या जून महिन्यात या योजनेतील रोहीत्र (Transformer) चोरीला गेल्यामुळे ही योजना तेव्हापासून बंद होती. सद्यस्थितीत रोहीत्र व क्युबिकल मिटरींगच्या उभारणीची कामे व त्यासंबंधीच्या चाचण्या पूर्ण करुन विद्युत पूरवठा सुरु करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

सोनापूर टोमटा उपसा सिंचन योजनेतून सन २०१५-१६ मध्ये प्रथमत: ११५ हेक्टर क्षेत्रास सिंचन करण्यात आले असून सन २०१६-१७ मध्ये जास्तीत जास्त क्षेत्र सिंचित करण्याचे नियोजन आहे. इतर २ उपसा सिंचन योजनांची कामे पूर्ण करुन सिंचन सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याचे नियोजीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चासकमान धरणातील पाणी चाकणसाठी आरक्षित करण्याबाबत**

**(३३) ६४४२१ (०१-०९-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा - चाकण या 'ब' वर्ग नगरपरिषदेची निर्मिती गेल्या वर्षी झाली असून या ठिकाणी नागरीकरण व औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चासकमान धरणातील पाणी चाकण, शहरासाठी आरक्षित करावे अशी मागणी चाकण नगरपरिषदेने पुणे पाटबंधारे विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांना निवेदनाद्वारे केली आहे तसेच सद्यस्थितीत भामा आसखेड धरणातून भामा नदीपात्रात सोडण्यात येणारे पाणी पिण्यासाठी घेतले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,चासकमान धरणातील पाणी चाकणसाठी आरक्षित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०३-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

मुख्याधिकारी, चाकण नगरपरिषद यांनी भामा आसखेड धरणातून चाकण नगरपरिषदेकरीता पाणी आरक्षण ठेवणेबाबत मागणी दि. २/१/२०१६ च्या पत्राद्वारे अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांचेकडे केली. तथापि, विहिति नमुन्यात पाणी मागणी केलेली नसल्यामुळे आवश्यक कार्यवाही करणेबाबत मुख्याधिकारी चाकण नगरपरिषद, चाकण यांना दि.२४/५/२०१६ रोजी कळविणेत आले आहे.

सद्य:स्थितीत भामा आसखेड धरणातून भामा नदीत सोडण्यात येणारे पाणी चाकण नगरपरिषद पिण्यासाठी म्हणून घेत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तुमडीहेटी,मेडिगट्टा आणि चनाखा कोर्टा या प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्यांना नवीन भुसंपादन कायद्यानुसार मोबदला मिळण्याबाबत**

**(३४) ६५२२४ (०६-०१-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र तेलंगणा आंतरराज्य मंडळाच्या बैठकीत तुमडीहेटी, मेडिगट्टा आणि चनाखा कोर्टा बॅरेज या तीन बॅरेजचे काम सुरु करण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानुसार चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील एकूण ११३.८१ हेक्टर नदीकाठचे क्षेत्र बुडीत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कृष्णा खोऱ्यातील, ८१ टीएमसी पाणी महाराष्ट्र शासनाने घेण्यावर, आक्षेप नोंदवत तेलंगणा सरकारने, मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका मागे घेतली जात नाही तोपर्यंत गोदवरी पाणी वाटप करार करण्यात येवू नये अशी मा. राज्यमंत्री जलसंपदा यांनी दिनांक ०८ मार्च,२०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र आणि तेलंगणा या दोन राज्यांमधील झालेल्या सिंचन करारानुसार राज्यातील, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयातील, ३० हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येवून, उपसा सिंचन योजनांना बारमाही शाश्वत पाण्याचा स्त्रोत, उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्यांना नवीन भुसंपादन कायद्यानुसार मोबदला देण्याबाबत व त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०३-२०१७)** :(१) होय, मा.मुख्यमंत्री, तेलंगणा राज्य व मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०८-०३-२०१६ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र व तेलंगणा राज्यातील आंतरराज्य सिंचन प्रकल्पाबाबतचे सर्व निर्णय परस्पर सामंजस्याने घेणेबाबतच्या सामंजस्य करार झाला आहे. महाराष्ट्र व तेलंगणा राज्यातील आंतरराज्य सिंचन प्रकल्पामध्ये तुमडीहेटी, मेडीगड्डा व चनाखा कोर्टा बॅरेजचा समावेश आहे. दिनांक २३/०८/२०१६ रोजी आंतराज्यीय मंडळाचे मुंबई येथे झालेल्या बैठकीत सदर बॅरजच्या नियंत्रक पातळ्या, भूसंपादन कार्यपध्दती, पाणी वाटप, प्रकल्प खर्चातील हिस्सा याबाबतचे निर्णय झाले आहेत.

(२) अंशतः खरे आहे, तुमडीहेटी व मेडीगड्डा बॅरेजमुळे चंद्रपूर जिल्हयातील ९२.०५३ हेक्टर व गडचिरोली जिल्हयातील १७५.०१ हेक्टर अशी एकूण २६७.०६३ हेक्टर जमीन बाधीत होणार आहे. मात्र यामुळे एकही गावठाण बाधीत होत नाही.

चनाखा कोर्टा बंधारा हा यवतमाळ जिल्हयातील केळापूर तालुक्यांमध्ये प्रस्तावित असून, बंधाऱ्याच्या बांधकाम व संरक्षण भिंतीसाठी ६.७४ हे. जमीन संपादीत करणे आवश्यक आहे.

(३) आंध्रप्रदेश पुर्नगठन अधिनियम, २०१४ कलम ८९ मधील तरतुदीचे अनुषंगाने कृष्णा पाणी तंटा लवादाचे दि. १९/१०/२०१६ चे निर्णयास स्थगिती मागणारी याचिका तेलंगणा शासनाने दि.१३/१२/२०१६ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. मात्र मा.सर्वोच्च न्यायालयाने सदर याचिका दि.०९/०१/२०१७ रोजी फेटाळली आहे.

(४) होय, हे खरे आहे. तुमडीहेटी बॅरेजद्वारे ९ उपसा सिंचन योजनांना व मेडीगड्डा बॅरजचे पाणी पसाऱ्यातून ४ उपसा सिंचन योजनांना शाश्वत पाणी पुरवठा होणार असून त्याद्वारे चंद्रपूर जिल्हयातील १५३०० हेक्टर व गडचिरोली जिल्हयातील २५१७६ हेक्टर अशी एकूण ४०४७६ हेक्टर क्षेत्रास सिंचनासाठी पाण्याचा शाश्वत स्त्रोत उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे चनाखा कोर्टा बंधाऱ्याद्वारे महाराष्ट्र राज्यातील यवतमाळ जिल्हयामधील २०७४ हे. (उपसा सिंचनाद्वारे) क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

(५) या बंधाऱ्यामुळे कोणतेही गावठण बाधित होत नाही. दि.२३ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार उभय राज्याद्वारे संयुक्त सर्वेक्षणाद्वारे संपादित करावयाचे क्षेत्र निश्चित केले जाणार असून या क्षेत्राचे संपादन, "भूसंपादन करताना पारदर्शकता असण्याचा व वाजवी मोबदला मिळण्याचा हक्क पुनर्वसन व पुर्नस्थापना अधिनियम २०१३" नुसार अनुज्ञेय मोबदला देऊन केले जाणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या बंद पडलेल्या कंपन्या आणि महामंडळे सुरु करण्याबाबत**

**(३५) ६५३६३ (१६-०१-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या मालकीच्या ८३ कंपन्या व महामंडळे असून त्या पैकी २२ महामंडळे वा कंपन्या बंद आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बंद पडलेल्या मंडळांच्या कर्मचा-यांच्या वेतनावर शासनाला वर्षाला ६५ कोटी रुपये खर्च करावे लागत असल्याने ही तोटयातील किंवा बंद पडलेली महामंडळे कायमस्वरूपी बंद करावीत किंवा पुन्हा नव्याने सुरु करावीत असा सल्ला कॅगने राज्य शासनाला दिल्याचे दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानूसार शासनाने सदर कंपन्या व महामंडळाबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०३-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे, भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या दिनांक ३१/५/२०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या सार्वजनिक उपक्रमांसंबंधातील अहवालामध्ये ६५ राज्य सार्वजनिक उपक्रम कार्यरत आहेत आणि २२ सार्वजनिक उपक्रम कार्यरत नाहीत असे नमूद करण्यात आले आहे.
(२) उपरोक्त अहवालामध्ये, दिनांक ३१/३/२०१५ अखेर कार्यरत नसलेले २२ सार्वजनिक उपक्रमांमध्ये भांडवल (रु.३१८.५५ कोटी) व दीर्घ मुदतीची कर्जे (रु.६२०.३७ कोटी) अशी एकूण रु.९३८.९२ कोटीची गुंतवणूक असल्याचे नमूद केले आहे.
(३) राज्य शासनाने परिसमापित/बंद करण्याचा निर्णय घेतलेल्या राज्य सार्वजनिक उपक्रमांची मालमत्ता विक्री व परिसमापन कार्यवाही इत्यादी करण्यासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली वित्त विभागाच्या दिनांक ३०/१/२००६ च्या शासन निर्णयान्वये उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर उच्चाधिकार समितीच्या वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. राज्य शासनाने परिसमापित/बंद करण्याचा निर्णय घेतलेल्या राज्य सार्वजनिक उपक्रमांबाबत उच्चाधिकार समितीच्या दिनांक १/१०/२०१५ व दिनांक ९/११/२०१५ च्या बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. या बैठकांमध्ये

उच्चाधिकार समितीने संबंधित राज्य सार्वजनिक उपक्रमांना परिसमापित/बंद करण्याबाबतच्या प्रक्रीये संदर्भातील सूचना दिल्या आहेत.

राज्य शासनाच्या अखत्यारितील खालील राज्य सार्वजनिक उपक्रम परिसमापित /बंद करण्याच्या निर्णय शासनाने वेळोवेळ घेतलेला आहे :-

| अ.क्र. | प्रशासकीय विभाग व त्याच्या अधिनस्त बंद असलेली महामंडळे व उपकंपन्या |
|---|---|
| उद्योग विभाग | |
| १ | महाराष्ट्र इल्क्ट्रॅानिक्स महामंडळ मर्यादित |
| २ | मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित |
| ३ | एलोरा दुग्ध उत्पादन मर्यादित. |
| ४ | मराठवाडा चर्मोद्योग विकास महामंडळ |
| ५ | मराठवाडा दुग्ध व्यवसाय विकास महामंडळ मर्यादित. |
| ६ | गोदावरी गारमेटस मर्यादित |
| ७ | किनवट रुफींग टाईल्स मर्यादित |
| ८ | परभणी कृषी गोसवंर्धन मर्यादित |
| ९ | मराठवाडा सिरॅमिक कॅाम्प्लेक्स मर्यादित |
| १० | विदर्भ विकास महामंडळ मर्यादित |
| ११ | विदर्भ टॅनेरीज लिमिटेड |
| १२ | दि गोंडवाना पेंटस आणि मिनरल्स मर्यादित. |
| १३ | विदर्भ क्वॅालिटी सिडस मर्यादित |
| १४ | कोकण विकास महामंडळ मर्यादित |
| १५ | मे. सह्याद्री ग्लास वर्क्स मर्यादित |
| वस्त्रोद्योग विभाग | |
| १६ | महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित |
| १७ | दि प्रताप स्पिनिग, विव्हींग ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग मिल्स मर्यादित |
| जलसंपदा विभाग | |
| १८ | महाराष्ट्र भू-विकास महामंडळ |
| वित्त विभाग | |
| १९ | मॅफको लि. |

उपरोक्त महामंडळे / दुय्यम कंपन्या परिसमापित/बंद करण्याचा निर्णय सन २००१ ते २००५ या कालावधीमध्ये शासनाने वेळोवेळी घेतला आहे. तसेच महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ, महाराष्ट्र ग्रामीण विकास महांमडळ व महाराष्ट्र सिचंन विकास महामंडळ बंद करण्याचा शासनाने त्यापूर्वीच निर्णय घेतलेला आहे.

तसेच कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ पुनर्जिवित करण्याचा सन २००८ मध्ये शासनाने निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण विभागातील सिंचन अनुशेष दुर करण्यासाठी निधी देण्याबाबत**

**(३६) ६५३७७ (०२-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण विभागातील सिंचन अनुशेष दुर करुन येथील विकास कामासाठी पाच हजार कोटी रुपयांचे पॅकेज देण्याची लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, कोकण विभागातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०३-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे,

कोकण विभागातील सिंचन अनुशेष दुर करणेसाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक ०४.०८.२०१६ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

(२) व (३) कोकणातील सिंचनाचा अनुशेष कमी करण्यासाठी तातडीने निर्णय घेण्यात यावा. असे मागणीचे थोडक्यात स्वरुप आहे. तथापि, कोकणातील सिंचन प्रकल्पासाठी सन २०१६-१७ मध्ये रु.४२५.१७ कोटी इतक्या निधीची तरतुद शासनाने केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आलमट्टीच्या बॅकवॉटरमुळे सांगली परिसराला महापूराचा धोका निर्माण झाल्याबाबत**

**(३७) ६५३८१ (०२-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटक सरकारने आलमट्टी धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय घेतला असुन आलमट्टीच्या बॅकवॉटरमुळे सांगली परिसराला महापूराचा धोका निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केलेली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, सांगली परिसरामध्ये महापूरामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०३-२०१७) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) माध्यमातून आयोजित केलेल्या मुंबई दर्शन सहलीचा दर्जा सुधारण्याबाबत**

**(३८) ६६९८० (१६-१२-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या मा.पर्यटन मंत्र्यांनी घोषणा केलेल्या मुंबई दर्शन सहल मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास सांगणाऱ्या हुतात्मका स्मारकाला सहलीच्या नियोजीत स्थळांमधून वगळण्यात आले असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई दर्शन सहलीतून ऐतिहासिक ठिकाणी व इतर महत्वांच्या ठिकाणांचे पर्यटकांना बेस्टच्या दोन बसेसमधून दर्शन घडविले जाणार असुन दोन्ही बसेसच्या फेऱ्यामधून हुतात्मा स्मारकाला वगळण्यात आल्याने मुंबईकर नागरीकांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सहलीत मुंबईतील विविध किल्ले, परदेशी पर्यटकांची आकर्षण असलेली धारावी, मुंबईमध्ये वसलेली गावठाण वस्ती यांचा समावेश करण्यात आला नसून मॉलचा समावेश करण्यात आल्याने या सहलीचा दर्जा कमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०३-२०१७) :**(१) व (२) मुंबई दर्शन सहलीच्या प्रथम महिन्यातील फेरीमध्ये हुतात्मा स्मारकाचा समावेश नव्हता. सप्टेंबर, २०१६ पासूनच्या सर्व फेऱ्यांमध्ये हुतात्मा स्मारकाचा समावेश करण्यात आला आहे.

(३) व (४) मुंबई दर्शन सहलीमध्ये कोणत्याही मॉलचा समावेश करण्यात आलेला नाही. या सहलीची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ पर्यंत असल्यामुळे वेळेअभावी मुंबईमधील किल्ले, धारावी, गावठाण वस्ती इ. स्थळांचा समावेश या सहलीमध्ये करणे शक्य होत नाही. मुंबईमधील किल्यांसाठी तसेच धारावी, गावठाण वस्ती इ. साठी स्वतंत्र बस सेवा सुरु करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

___

**कु-हा वडोदा, इस्लामपूर उपसा सिंचन योजना (ता.मुक्ताईनगर, जि. जळगांव) व जळगांव जामोद, संग्रामपूर (जि.बुलढाणा) या उपसासिंचन योजना पूर्ण करण्याबाबत**

**(३९) ६७६४६ (०२-०१-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कु-हा वडोदा, इस्लामपूर उपसा सिंचन योजना (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) व जळगांव जामोद, संग्रामपूर, (जि.बुलढाणा) या उपसासिंचन योजना पूर्ण करण्यासाठी तापी पाटबंधारे महामंडळ व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या मागणीनुसार अधिकचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०३-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.
(२) सदर प्रकल्पास सन २०१६-१७ साठी रु.३६.०१ कोटी इतक्या निधीची तरतूद केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यात पावसाळ्यात जीवरक्षकाची नियुक्ती करण्याबाबत**

**(४०) ६८४६५ (१६-१२-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात पावसाळ्यातील गेल्या तीन महिन्यांत विविध पर्यटन स्थळी झालेल्या दुर्घटनात तब्बल २० जणांचा बुडून मृत्यू झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटन स्थळी होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी जीवरक्षकाची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०३-२०१७) :**(१) व (२) वसई तालुक्यातील विविध नऊ पर्यटनस्थळी जुलै, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत एकूण १० जणांचा बुडून मृत्यु झाला आहे. वसई तालुक्यातील सुरुची बाग (भास्कर आळी) व राजोडी बीच या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी जीवरक्षक नेमण्यात आले आहेत. तसेच महत्वाच्या समुद्र किनारी पोलीस ठाण्याचा दूरध्वनी क्रमांक, रुग्णवाहिका, सरकारी दवाखाने याबाबत सूचना फलक, टेहळणी मनोरे, सायरन, सर्च लाईट इत्यादी व्यवस्था करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाणी आरक्षणाचे अधिकार उप समितीला देण्याबाबतच्या निर्णयाबाबत**

**(४१) ६९५१६ (०२-०१-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने पिण्याच्या पाण्यानंतर शेती ऐवजी उद्योगांना, प्राधान्याने पाणी पुरविण्यासाठी, पाणी आरक्षणाचे अधिकार, मंत्रीमंडळ उप समितीला देण्याचा निर्णय दिनांक २३ ऑगस्ट,२०१६ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या सदरहू निर्णयाचे स्वरुप व कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०३-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

दि. ०८.११.२०१६ च्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार पाणी वापराच्या प्राधान्यक्रमात कोणताही बदल करण्यात आला नसून पाण्याचे क्षेत्रीय वाटप निर्धारीत करुन त्या मर्यादेनुसार पाणी वाटपाचे अधिकार निश्चीत करुन महामंडळास देण्यात आले आहे.

त्यानुसार महामंडळास निर्धारित केलेल्या क्षेत्रिय वाटपापेक्षा जादा होणारे बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी मा.मंत्रीमंडळ उप समिती गठीत करण्यात आली आहे.

(२) सन २०११ मध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मध्ये झालेल्या दुरुस्तीनुसार बिगर सिंचन पाणी आरक्षणाचे प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळ स्तरावर मान्य होण्यास होत असलेली दिरंगाई कमी करण्यासाठी दि. ०८.११.२०१६ च्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

अ) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम १६ (क)(१) नुसार पूर्ण झालेल्या, प्रगतीपथावरील व नियोजित सिंचन प्रकल्पातून विविध प्रवर्गाकरिता खालीलप्रमाणे क्षेत्रिय वाटप (sectoral allocation) निर्धारित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| (अ) | पिण्यासाठी | १५ टक्के |
| (ब) | औद्योगिक | १० टक्के |
| (क) | सिंचन | ७५ टक्के |

ब) निर्धारित केलेल्या क्षेत्रिय वाटपाच्या मर्यादेच्या पिण्याच्या पाण्याच्या व औद्योगिक पाणी वापराच्या आरक्षण प्रस्तावास महामंडळ स्तरावरुन मान्यता देण्यात येईल.

क) निर्धारित केलेल्या क्षेत्रिय वाटपापेक्षा जादा होणारे वैयक्तिक व ग्रामपंचायती,नगर पालिका, नगरपंचायती, जिल्हापरिषदा, कटकमंडळे, सहकारी गृहनिर्माण संस्था व शिक्षण संस्थांच्या पिण्याच्या पाण्याचे आणि सुक्ष्म व लघु उद्योगांचे औद्योगीक पाणी वापराचे प्रस्तावांना शासनस्तरावरुन मा.मंत्री (जलसंपदा) यांच्या मंजूरीने मान्यता देण्यात येईल.

ड) परिच्छेद (अ) मध्ये निर्धारीत केलेल्या क्षेत्रीय वाटपापेक्षा जादा होणारे व परिच्छेद (ब) मधील नमूद प्रस्ताव वगळून पिण्याच्या व औद्योगिक पाणी वापराच्या आरक्षण प्रस्तावांना मा.मंत्रीमंडळ उपसमितीच्या स्तरावरुन मान्यता द्यावी. सदर मा.मंत्रीमंडळ उपसमिती गुणवत्तेवर आधारीत निर्णय घेईल. निर्णय घेताना अशा आरक्षणामुळे सिंचनावर होणाऱ्या परिणामाचाही विचार करण्यात येईल.

इ) सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी खालीलप्रमाणे मा.मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. मा.मंत्री, जलसंपदा | - अध्यक्ष |
| २. मा.मंत्री, उद्योग | - सदस्य |
| ३. मा.मंत्री, कृषि | - सदस्य |
| ४. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता | - सदस्य |
| ५. मा.मंत्री, जलसंधारण | - सदस्य |
| ६. मा.राज्यमंत्री, नगरविकास | - सदस्य |
| ७.सचिव (ज.सं.व्य व ला.क्षे.वि.) | - सदस्य सचिव |

(३) मा.मंत्रीमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/(४४/१५)/सिंव्य (धोरण), दि. १७.११.२०१६ अन्वये बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावाना सक्षम स्तरावरुन मान्यता देण्याबाबत अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रलंबित व अपूर्णावस्थेत असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी**
**कर्जरोखे काढण्याच्या निर्णयाबाबत**

**(४२) ६९८६५ (०९-०१-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने गेल्या काही वर्षात प्रलंबित व अपूर्णावस्थेत असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी १५ हजार कोटींचे कर्जरोखे काढण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्जरोखे किती वर्षाच्या काळासाठी काढले जाणार आहेत,

(३) असल्यास, १५ हजार कोटींचे कर्जरोखे काढण्यात आल्यानंतर त्यांच्या मॅच्युरिटीच्या वेळेस शासनाने रक्कम परत देण्यासाठी काय नियोजन केले आहे ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०३-२०१७) :**(१) प्रलंबित व अपूर्णावस्थेत असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रु.१५००० कोटींचे कर्जरोखे काढण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(२) याबाबतचा निर्णय अद्यापी झालेला नाही.

(३) जलसंपदा विभागाच्या नियतव्ययातून सदर कर्जरोख्याची रक्कम परत करण्याचे प्रस्तावित आहे.

---

### मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्याला उजनीतील माण नदीचे पाणी सोडण्याबाबत

**(४३) ६९९९० (०६-०१-२०१७). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुकात उजनीतील माण नदीतून सुटणारे पाणी शेतकरी व ग्रामपंचायती पाणीपट्टी भरण्यास तयार असतानाही शेतकऱ्यांना मागणीनुसार पाणी देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार उजनीतील पाणी माण नदीतून सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०३-२०१७) :**(१) उजनी प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प अहवालामध्ये उजनी धरणातून कालव्याद्वारे माण नदीत सिंचनासाठी किंवा पिण्यासाठी पाणी सोडण्याची तरतूद नाही. तथापि, उजनी धरणातील पुराचे अतिरिक्त पाणी दि.२४/०९/२०१६ ते १४/१०/२०१६ या कालावधीत उजनी उजव्या कालव्याद्वारे माण नदीत सोडून माण नदीतील को.प. बंधाऱ्यामध्ये १५२.७१ दलघफू पाणीसाठी करण्यात आला होता.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड जिल्हयातील विष्णुपुरी प्रकल्पाचे पाणी वरच्या भागातील शेतक-यांना मिळण्याबाबत

**(४४) ७०२७४ (०२-०१-२०१७). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील विष्णुपुरी प्रकल्पाचे पाणी वरच्या भागातील शेतक-यांना मिळावे यासाठी ७० कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या डेरसा उपसा सिंचन योजनेच्या पूर्ततेनंतर एकदाही तिची चाचणी घेण्यात आली नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पूर्ण होऊन दोन वर्षाचा कालावधी लोटला असला तरी या योजनेची बहुतांशी रक्कम कंत्राटदारांना अदा करण्यात आली आहे तसेच सदर योजनेवर निविदा मंजूर करताना बारा टक्के अधिक दराने ते मंजूर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०३-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

डेरला उपसा सिंचन योजनेच्या पंपाची चाचणी दिनांक १६/१०/२०१२ ते ०१/०१/२०१३ या कालावधीमध्ये घेण्यात आले आहे.

तथापि, मागील काही वर्षापासून दुष्काळी परिस्थितीमुळे विष्णुपुरी बंधाऱ्यातील जलसाठा जिल्हाधिकारी, नांदेड यांचेमार्फत वेळोवेळी पिण्यासाठी आरक्षित केल्याने विष्णुपुरी प्रकल्पावर सिंचनासाठी पाणी सोडणे शक्य झाले नाही. सबब डेरला उपसा सिंचन योजनेच्या बंद नलिका वितरण व्यवस्थेची चाचणी घेणे शक्य झालेले नाही.

(२) होय.

सदर योजनेची शिर्ष व वितरण व्यवस्थेची बहुतांश कामे पूर्ण झाल्याने केलेल्या कामाची देयके संबंधीत कंत्राटदारास वेळोवेळी अदा करण्यात आलेली आहेत. वितरण व्यवस्थेची निविदा अंदाजपत्रकीय किंमतीवर (दरसूची २००९-१०) १२.२६ टक्के जास्त दराने तसेच अद्यावत किंमतीवर (त्यावेळच्या प्रचलित दरसूची २०१०-११) ४.९६ टक्के जादा दराने स्विकृत करण्यात आली आहे.

(३) निविदा स्विकृतीची कार्यवाही नियमानुसार झालेली असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लोहा व कंधार अवर्षणग्रस्त तालुक्यातील उध्र्व मानार प्रकल्पाला निधी देण्याबाबत

**(४५) ७०५६२ (०२-०१-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उध्र्व मानार प्रकल्पातंर्गत (ता.लोहा, जि.नांदेड) लोहा व कंधार अवर्षणग्रस्त तालुक्यातील सिंचन क्षेत्र येत असून या प्रकल्पाला वेळोवेळी आवश्यक निधी न मिळाल्यामुळे हा प्रकल्प अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उध्र्व मानार प्रकल्प (ता.लोहा, जि.नांदेड) या धरणाच्या उर्वरित कामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक १८ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना पत्रव्यवहार करुनही अदयापी कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने उर्वरित कामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०३-२०१७) :**(१) होय.

(२) दिनांक १८ मे, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांना लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे निधी उपलब्ध करुन देण्यासाठी विनंती केली आहे. सन २०१६-१७ मध्ये रु.२० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

(३) राज्याच्या अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांचे विभागनिहाय निधी वाटपाचे निर्देश यानुसार उर्ध्व मानार प्रकल्पास प्राधान्याने निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.
(४) विलंब झालेला नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथे शिवसृष्टी उभारण्यासाठी मान्यता देण्याबाबत**

**(४६) ७१९२७ (१६-१२-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) येथे शिवसृष्टी उभारणे या कामाला प्रादेशिक पर्यटन योजनेतून प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार येवला येथे शिवसृष्टी उभारण्यासाठी मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०३-२०१७) :**(१), (२), व (३) येवला येथे शिवसृष्टी उभारण्याची विनंती अमान्य करण्यात आली आहे.

---

**त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज संजीवन समाधी स्थळाचा "अ" वर्ग पर्यटन स्थळामध्ये समावेश करण्याबाबत**

**(४७) ७१९३६ (१६-१२-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज संजीवन समाधी स्थळाचा अ वर्ग पर्यटन स्थळामध्ये समावेश करण्याची नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०३-२०१७) :**(१) होय. मा.लोकप्रतिनिधींचे पत्र जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे प्राप्त झाले आहे.
(२) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, नाशिक यांना याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रांगव धरणाच्या लगतचे डोंगर खचल्याबाबत**

**(४८) ७२४६० (०६-०१-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रांगव धरणाच्या दोन्ही बाजू लगत असणारे डोंगर सुमारे ५० मीटर खचले असून माती मोठ्या प्रमाणात रिंगरोडवर आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे डोंगर खचल्यामुळे धरणाच्या सुरक्षिततेचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०३-२०१७) :**(१) नाही. तथापि, अतीवृष्टी मुळे डोंगर उतारावरील मऊ स्तरांचे भाग स्खलित होवून रिंगरोडवर दगडमाती आली आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील चिटबारी परिसराचा विकास करण्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(४९) ७२९३० (१६-१२-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील चिटबारी परिसरातील गायका डोंगर कपारीतून आदळणारा धबधबा पर्यटकाना आर्कषित करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धबधब्याच्या पायथ्याशी स्वयंभू गणपती व परशुराम मंदिर असून येथे मोठ्या प्रमाणात भाविक येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करुन देऊन परिसराचा विकास करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०३-२०१७) :**(१) होय,

(२) होय,

(३) याबाबत शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मन प्रकल्प विभाग, खामगाव (जि.बुलढाणा) येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(५०) ७३७९१ (१३-०१-२०१७). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि. बुलढाणा) येथील मन प्रकल्प विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२). असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी पदे भरण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०३-२०१७) :**(१) होय.

बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा कडे मन प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापनेचे काम हस्तांतरीत करण्यात आले आहे. या विभागातील एकूण ११७ पदांपैकी ७८ पदे भरण्यात आली असून, ३९ पदे रिक्त आहेत. या ३९ पदांपैकी उपविभागीय अभियंता-१, कनिष्ठ अभियंता-११, गट क मधील २४ व गट ड मधील ३ याप्रमाणे पदे रिक्त आहेत.

(२) होय.

क्षेत्रिय स्तरावर झालेल्या बैठकीमध्ये रिक्त पदे भरण्याबाबत मागणी केली आहे.

(३) गट क व ड ची पदे सरळसेवेने भरती करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावरील अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, अमरावती, कार्यालयाकडून करण्यात येते. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) ही पदे एप्रिल-मे महिन्यात होणाऱ्या सार्वत्रिक बदल्या-२०१७ मध्ये भरण्याच्या सूचना मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांना देण्यात आल्या आहेत. तसेच कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) ही पदे सरळसेवेने भरण्याबाबत कार्यवाही देखील सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.